




# दैनिक वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● शुक्रवार ९ ऑगस्ट २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष १ ले ● अंक ३५८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये







## छ.संभाजीनगरमध्ये बच्चू कडूंनी लगावली अधिकाऱ्याच्या कानशिलात !

# ज्या दिवशी रिक्षा दिल्या, त्याच दिवशी पडल्या बंद !

### बच्चू कडूंचा आक्रमक पवित्रा

**छ. संभाजीनगर/प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने सर्वच नेतेमंडळी कामाला लागली असून आपले दौरे करत आहेत. मनसे अध्यक्ष राज ठाकरे, राष्ट्रवादीचे अजित पवार, मराठा नेते मनोज जरांगे, वंचित बहुजन आघाडीचे प्रकाश आंबेडकर तर प्रहारचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू हेही विविध दौऱ्यावर आहेत. आज छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर असताना आमदार बच्चू कडू यांनी अंध-अपंग बांधवांच्या समस्या ऐकून घेत प्रशासकीय व ई-रिक्षा कंपनीच्या अधिकाऱ्यांना जाब विचारला. यावेळी, त्यांनी कडूस्टाईलने एका अधिकाऱ्याला हलकीशी कानशिलात लगावली. दिव्यांग बांधवांना समाज कल्याण विभागाकडून देण्यात आलेल्या ई-रिक्षांमध्ये एकाच दिवसांत बिघाड झाल्याची तक्रार घेऊन दिव्यांग बांधव आमदार कडू यांच्याकडे गेले होते. त्यावेळी, आमदार कडू यांनी नेहमीप्रमाणे अधिकाऱ्यांची कानउघडणी केल्याचा पाहायला मिळालं. प्रहार संघटनेच्या माध्यमातून आमदार बच्चू कडू दिव्यांग बांधवांच्या समस्या आणि त्यांच्यासाठी शासन दरबारी आवाज उठवतात. दिव्यांगांच्या प्रश्नांसाठी त्यांनी



अनेकदा मोर्चे, आंदोलनेही काढली आहेत. तर, काहीवेळा, प्रशासकीय अधिकाऱ्यांशी पंगाही घेतला आहे. एखाद्या अधिकाऱ्याच्या कानशिलात लगाव, कुणावर लॅपटॉप फेकून मार.. अशा बच्चू कडू यांच्या घटनाही सोशल मीडियात यापूर्वी व्हायरल झाल्याचं पाहायला मिळालं आहे. आता, छत्रपती संभाजीनगरमध्येही तशीच एक घटना घडली. त्यामध्ये, प्रशासकीय अधिकाऱ्यांवर बच्चू कडू यांचा पारा चढल्याचं दिसून आलं. आमदार कडू यांनी ई-रिक्षा देणाऱ्या योजनेशी संबंधित समाजकल्याण विभागातील अधिकाऱ्याना जाब विचारला, तर ई-रिक्षा कंपनीच्या अधिकाऱ्याच्या कानाखाली लगावली आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये अंध अपंग व्यक्तींना उदरनिर्वाहासाठी समाजकल्याण विभागाकडून ई-रिक्षा देण्यात आल्या होत्या. मात्र, ज्या दिवशी या रिक्षा दिल्या, त्याच दिवशी त्या बंद पडल्या. या सगळ्या रिक्षा घेऊन अंध दिव्यांग व्यक्ती आमदार बच्चू कडू यांच्याकडे आले होते. त्यावेळी, बच्चू कडू यांनी संबंधितांना जाब विचारताना एका अधिकाऱ्यांना हलकीशी कानशिलात लगावल्याचं पाहायला मिळालं. प्रशासकीय स्तरावर होतो नाहक त्रास दरम्यान, शासनाकडून आर्थिक दुर्बल, गरीब, दिव्यांग, कामगार व शेतकरी बांधवांसाठी नवनवीन योजना राबवल्या जातात. अनेकदा या योजनेतून लाभार्थ्यांचे कल्याण व्हावे, त्यांचा उतरनिर्वाह व्हावा, हाच उद्देश डोळ्यासमोर असतो. मात्र, प्रशासकीय पातळीवर योजनांची अंमलबजावणी होताना लाभार्थ्यांना नाहक त्रास दिला जातो. काहीवेळा पैशांचीही मागणी केली जाते. त्यावेळी, स्थानिक लोकप्रतिनीधींना घेऊन हा प्रश्न मार्गी लावला जातो. त्यामुळे, दिव्यांग बांधवांनी आमदार बच्चू कडू यांच्याकडे गेले असता, बच्चू कडू यांनी त्यांच्यास्टाईलने अधिकाऱ्यांना झापले.



## चौसाळयाच्या बसस्थानकातुन महिलेचे मंगळसुत्र पळविले

(चौसाळा प्रतिनिधी) बीड तालुक्यातील चौसाळा बसस्थानक सध्या चर्चेचा विषय बनत असुन याठिकाणी चोरीच्या घडताना पाहायला मिळत असुन याठिकाणी कायमस्वरूपी पोलीस कर्मचारी देण्याची मागणी जोर धरताना पाहायला मिळत आहे काल चौसाळा परिसरातील पालसिंघन येथिल महीला कांलिदा रामभाऊ जगताप या चौसाळा बसस्थानकातुन प्रवास करण्यासाठी बसमध्ये चढत असताना महिलेच्या गळयातील ५ ग्रॅमचे ४० हजार रूपये किंमतीचे मणिमंगळसुत्र अज्ञात चोरटयांनी चोरून नेले आहे यामुळे प्रवाशीवर्गात चिंतेची बाब निर्माण झाली असुन याठिकाणी कायम स्वरूपी पोलिस कर्मचारी देण्याची मागणी जोर धरत आहे

## बीडच्या जिल्ह्याच्या ११ ब्लॉकसाठी जवाहर नवोदय विद्यालयाची परीक्षा १८ जानेवारी २०२५

**बीड प्रतिनिधी :-**

बीड, दि. 8 जिल्ह्याच्या अकरा ब्लॉगसाठी जवाहर नवोदय विद्यालयाची परीक्षा 18 जानेवारी 2025 ला होणार आहे. यासाठी पालकांनी त्यांच्या पाल्यांसाठी अर्ज करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

ग्रामीण भागातील मुला-मुलींना गुणात्मक आणि आधुनिक शिक्षण मिळावे यासाठी जवाहर नवोदय विद्यालय समितीची स्थापना करण्यात आली असून या अंतर्गत सामाजिक मूल्य पर्यावरण जागृती शारीरिक शिक्षण यासारख्या महत्त्वाच्या घटकांचा समावेश करून ग्रामीण भागातील हुशार मुलींना त्यांच्या कुटुंबाची आर्थिक व सामाजिक स्थिती विचारात न घेता संपूर्ण देशात समान स्तरावर इंग्रजी व हिंदी माध्यमातून शिकविण्याची सुविधा उपलब्ध आहे. नवोदय विद्यालयात प्रवेशासाठी प्रवेश परीक्षा घेतली जाते. या निवासी शाळा आहेत. ज्या केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत जवाहर नवोदय विद्यालय समिती मार्फत चालविल्या जातात.

बीड जिल्ह्यातील अकरा ब्लॉकलसाठी पुढील वर्षाच्या 18 जानेवारी 2025 ला यासाठी प्रवेश परीक्षा होणार असून यामध्ये अधिकाधिक विद्यार्थ्यांनी परीक्षा देऊन या परीक्षेत पात्र व्हावे असे आवाहन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले आहे.

# कुंडलिक खांडेंचा जामीन लांबणीवर

### शिवसेनेचे तत्कालीन जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांच्यासह इतरांवर गुन्हा दाखल झाला होता.

**बीड प्रतिनिधी**

बीड : शिवसेनेचे बडतर्फ जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांच्या जामीन अर्जावर आज सुनावणी झाली. यामध्ये उच्च न्यायालयाच्या पीठाने हे प्रकरण दुसऱ्या पीठाकडे घेऊन जाण्यास सांगितले असून सध्या तरी कुंडलिक खांडे यांचा जामीन लांबणीवर पडला आहे. शिवसेना उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर खांडे यांच्यावरील प्राणघातक हल्ला प्रकरणात शिवसेनेचे तत्कालीन जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांच्यासह इतरांवर गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणात



कुंडलिक खांडे सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. कुंडलिक खांडे यांचा जामीन अर्ज बीडच्या जिल्हा न्यायालयाने फेटाळल्यानंतर त्यांनी जामिनासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात धाव घेतली होती. न्या. एस. जी. मेहरे यांच्यासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरु झाली होती. मागच्या तारखेत सरकारी वकिल अमरजितसिंग गिरासे युक्तिवादासाठी वेळ मागून घेतला होता. त्यामुळे या प्रकरणाची सुनावणी 8 ऑगस्ट रोजी ठेवण्यात आली होती. काल या प्रकरणाची सुनावणी सुरु झाल्यानंतर याच गुन्ह्याशी संबंधित एका आरोपीच्या अटकपूर्व जमिनीचे प्रकरण न्या. शिवकुमार डिगे यांच्यासमोर सुरु असल्याची बाब न्यायालयाच्या निदर्शनास आली. काही महिन्यापूर्वीच उच्च न्यायालयातील कामकाजाच्या संदर्भाने काही निर्देश तयार करण्यात आले असून त्यात एखाद्या गुन्ह्यातील एखादे प्रकरण अगओड्र ज्या न्यायालयासमोर सुरु आहे, त्या गुन्ह्याशी संबंधित इतर प्रकरणे देखील त्याच न्यायालयाने ऐकावीत असे निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे आजच्या सुनावणी दरम्यान न्या. एस. जी. मेहरे यांनी याचिकाकर्त्यांच्या वकिलांना या प्रकरणात न्या. शिवकुमार डिगे यांच्या बेंचसमोर जाण्यास सांगितले आहे. त्यामुळे आता कुंडलिक खांडे यांच्या जमीन अर्जावरील सुनावणीला आणखी वेळ लागणार आहे. सध्या तरी खांडे यांचा मुक्काम कारागृहातच असणार आहे.

## शुक्रवारी 'घरो घरी तिरंगा' या उपक्रमातंर्गत तिरंगा रॅलीचे आयोजन

**बीड - प्रतिनिधी**

, दि. 8 बीड, 8: स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर मागील काही वर्षांपासून घरो घरी तिरंगा हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यातंर्गत उद्या शुक्रवारी तिरंगा रॅली चे आयोजन छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण येथुन करण्यात येत आहे.राज्यभर घरोघरी तिरंगा उपक्रम राबविण्यात येत असून या अतंर्गत बीडमध्ये शुक्रवारी सकाळी 10:30 वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण येथुन या उपक्रमाचा शुभारंभ होणार असून ही रॅली पुढे कारंजा-भाजीमंडई मार्ग-छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल यामार्गास जाणार आहे.

घरो घरी तिरंगा या उपक्रमाअंतर्गत तिरंगा रॅली , तिरंगा मॅरेथॉन, तिरंगा सांस्कृतिक कार्यक्रम, तिरंगा कॅनव्हास, तिरंगा प्रतिज्ञा, तिरंगा सेल्फी, तिरंगा सेल्फीज, तिरंगा ट्रिब्युट, तिरंगा मेळा असे उपक्रम राबविण्यात येणार आहे. या तिरंगा रॅलीमध्ये बीडच्या नागरीकांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हा प्रशासनाने किया केले आहे.

# नगर-बीड रेल्वेला गती : अंमळनेर ते एगनवाडीचे हायस्पीडची आज रेल्वे टेस्टिंग

**बीड/प्रतिनिधी**

अहमदनगर-आष्टी रेल्वे सुरु झाल्यानंतर रेल्वेचा पुढचा टप्पा म्हणजे अंमळनेर ते एगनवाडी पर्यंत ही रेल्वे धावणार आहे. त्यासाठीचे टेस्टिंग 9 ऑगस्ट रोजी होत आहे. नगर बीड परळी रेल्वे पण सर्वांसाठीच आनंदाची बातमी आहे. दोन वर्षापूर्वी अहमदनगर पासून ते सोलापूरवाडी दरम्यात ह्या रेल्वेची चाचणी घेण्यात आली होती. एकूण 35 किमी अंतर ही चाचणी घेण्यात आली होती. आतापर्यंत तीन चाचण्या झाल्या. एकदा नगर ते नारायणडोह पर्यंत बारा किमी, आणि नगर ते सोलापूरवाडी 35.5 किलोमीटर आणि नगर ते आष्टी हे 60 किमी चे नगर ते अंमळनेर या 66 किलोमीटर अंतरावर हाय स्पीड चाचणी घेण्यात आली होती त्यानंतर आता अंमळनेर ते एगनवाडी चाचणी होत आहे . हे अंतर आष्टी ते एगनवाडी (66.12 किमी) इतके आहे. अहमदनगर-बीड-परळी हा रेल्वेमार्ग जिल्ह्यासाठी महत्त्वाचा विकास प्रकल्प आहे.या रेल्वे मार्गाची मागणी फार जुनी होती. एकूण 261 किलोमीटरच्या रेल्वे मार्गाला 1995 मध्ये मंजुरी मिळाली. या रेल्वे मार्गावर अनेक मोठे पूल बांधण्यात आले. आष्टी तालुक्यातील खुंटेफळ नजीकच्या नदीवर मोठे 13 गाळे असलेला मोठा पूल बांधण्यात आला आहे. पुलाची उंची 33 फुट उंच आहे. त्यासाठी मोठे तांत्रिक कौशल्य वापरून दक्षिण रेल्वे वरील सर्वात मोठा गल्डर टाकून रेल्वे रूळ अंथरण्यात आले आहेत. अनेक ठिकाणी मोठे पूल बांधण्यात आले आहेत. त्यामुळे या कामाला वेळ लागत आहे. सुरुवातीला नारायणडोह पर्यंत चाचणी घेण्यात आली. त्यानंतर 2019 मध्ये बीड जिल्ह्यात आष्टी तालुक्यात सोलापूरवाडीपर्यंत रेल्वे धावली आहे. आतापर्यंत बीड जिल्ह्य हद्दीत 23.5 किलोमीटर रेल्वे प्रत्यक्ष धावली आहे . नगर ते नारायणडोह या 12 किलोमीटर अंतरावरील रेल्वे मार्गावर मार्च 2018 मध्ये रेल्वेचे इंजिन धावले होते . रहाशवपरसरी लशशव रीश्रळ ीरळश्रुरू श्रळपश ीीर्रीीं सध्यस्थीतीत नगर ते एगनवाडी पर्यन्त 66.12 किमी अंतरावर रेल्वेचे काम 100 टक्के पूर्ण झाले असुन त्यासाठी चाचणी घेण्यात येणार असल्याचे रेल्वे विभागाने सांगितले. रहाशवपरसरी लशशव रीश्रळ ीरळश्रुरू अहमदनगर-बीड-परळी वैजनाथ रेल्वेचे काम प्रगती पथावर आहे. या संदर्भात दिलेल्या माहितीनुसार अहमदनगर-बीड-परळी-वैजनाथ नवीन लाईन-लांबी – 261.25 किमी लांबी कार्यान्वित – 66.18 किमी उर्वरित – 195.25 किमी एकूण शारीरिक प्रगती – 78% जमीन संपादन – 1821.56/1806.19 हेक्टर (99%) अ) पूर्ण झालेला विभाग-अहमदनगर ते आष्टी (66.18 किमी) ब) पूर्णत्वाच्या जवळ- (या आर्थिक वर्षात सुरू होण्याची शक्यता आहे) आष्टी ते एगनवाडी (66.12 किमी) क) प्रगतीपथावर आहे-इगनवाडी ते परळी (127.95 किमी) पूर्ण झालेली कामे-अर्थवर्क- 419.235/430.43 (97.40%) प्रमुख पूल – 49/64 (77%) मायनर ब्रिज – 250/301(83%) ठजइ/ठणइ – 126/195 (65%) बॅलास्ट पुरवठा – 6.54/7.52 ङ्ला (87%) ट्रॅक लिंकिंग – 118.38/285.89 किमी (41%) पॉवर लाईन क्रॉसिंग – 568/626 (91%)

# पवनचक्की कंपन्यांच्या दडपशाही विरोधात कानडीघाट शेतकरी आक्रमक; नुकसानभरपाईची मागणी, पोलिस फौजफाटा गावात दाखल :- डॉ.गणेश ढवळे

**बीड प्रतिनिधि**

चौसाळा:- ( दि.०८) बालाघाटावर पवनचक्की कंपन्यांचे मोठ्या प्रमाणावर पेव फुटले असुन पवनचक्की कंपन्यांच्या मनमानी कारभार विरोधात आज दि.८ गुरुवार रोजी कानडीघाट येथील शेतकरी आक्रमक झाले असुन त्यांनी टॉवरची तार ओढण्याचे काम बंद पाडले असून अगोदर आम्हाला आमच्या शेतातील टॉवर उभारणी कामाचा तसेच उभ्या पिकातुन तार ओढणीचे काम केल्यास पिकांचे नुकसान होणार असुन अगोदर भरपाई द्या त्यानंतरच तार ओढण्याचे काम करा अशी भूमिका घेतली .पवनचक्की कंपन्यांनी अरेरावीची भाषा करत सुरूवातीला दंडेलशाही पद्धतीने काम रेटण्याचा प्रयत्न केला त्यामुळे शेतकरी आणखीनच आक्रमक झाले. पवनचक्की कंपन्यांच्या आधिका-यांनी पोलिसांना पाचारण केल्यानंतर गावात मोठ्या प्रमाणावर पोलीस पाऊस फाटा जमा झाला होता त्यामुळे गावामध्ये काहीकाळ तणावाचे वातावरण होते. अखेर पवनचक्की कंपन्यांचे अधिकारी व कर्मचारी काम न करताच निघून गेले.

ओ २ कंपन्यांकडून शेतकऱ्यांची दिशाभूल आणि फसवणूक :- श्रीकांत कवडे

गोलंग्री,कानडीघाट,सुलतानपुर या गावांमध्ये ओ २ कंपन्यांचे टॉवर उभारणे आणि तार ओढण्याचे काम सुरू असून शासकीय परीपत्रकाप्रमाणे नुकसान भरपाई देण्यासाठी ३५ मीटर रूंदीचा नियम असताना जुने शासकीय परीपत्रके दाखवून १६ मीटर प्रमाणे नुकसान भरपाई घ्या म्हणतात तसेच याठिकाणी उभारलेल्या २६ टावर उभारण्यात आले असुन प्रत्येकाला नुकसान भरपाईचा मोबदला वेगवेगळा दिलेला आहे. गंभीर बाब म्हणजे या शेतकऱ्यांकडे करारनाम्याची प्रत नाही दिशाभूल करून सह्या घेतलेल्या आहेत.मे मध्ये ज्या शेतकऱ्यांच्या शेतात टावरचे काम झाले आहे त्यांना अद्याप मोबदला देण्यात आलेला नाही. एकंदरीतच शेतक-यांच्या अज्ञानाचा गैरफायदा कंपन्यांचे अधिकारी घेत असुन पोलिस प्रशासन शेतकऱ्यांच्या पाठीशी न उभे राहता कंपन्यांच्या बाजुने उभे रहाताना दिसत आहे. असे मत श्रीकांत कवडे यांनी व्यक्त केले.

उभ्या पिकांची नुकसान भरपाई अगोदर द्या नंतरच काम करा :- विठ्ठल झोडगे ( शेतकरी कानडीघाट)

ओ २ कंपन्यांचे अधिकारी आणि कर्मचारी आमच्या उभ्या पीकातुन विद्युत तार ओढण्यासाठी आलेले असुन उन्हाळ्यात टावर उभारणीचे काम



पूर्ण झालेले असताना तेव्हा तार ओढण्याचे काम न करता सध्या आमच्या उभ्या पिकातुन तार ओढण्यासाठी आलेले असुन आमच्या पिकांची नुकसान भरपाई द्यावी किंवा पिक काढल्यावर तार ओढण्याचे काम करण्यात यावे अशी आमची मागणी असुन कंपन्यांचे अधिकारी पोलिस फौजफाटा बोलावून दमबाजी करत तार ओढण्याचा प्रयत्न करत असुन आम्ही ग्रामस्थांनी तो हाणुन पाडला असुन आम्हाला नुकसान भरपाई मिळाल्याशिवाय काम करू न देण्याचा पवित्रा ग्रामस्थांनी घेतला आहे. असे विठ्ठल झोडगे यांनी सांगितले.

कंपन्यांनी मोबदला म्हणून दिलेले धनादेश खात्यात पैसे नसल्याने वटला नाही :- सुभाष झोडगे

कानडीघाट येथील शेतकरी सुभाष रामभाऊ झोडगे यांना ६ लाख रूपयांचा धनादेश दि.१० जुन २०२४ रोजी दिला होता. सुभाष यांचे वडील रामभाऊ यांना बार्शी येथील दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले असुन उपचारासाठी पैसे काढण्यासाठी धनादेश बँकेत जमा केला असता खात्यावर पैसे नसल्याने वटला नाही.यापुर्वीही दोन वेळा अशा घटना घडलेल्या आहेत.त्यामुळे कंपनीच्या आर्थिक व्यवहार विषयी शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.व्यवहार संशयास्पद असल्याने शेतकरी चिंताग्रस्त आहेत.

पवनचक्की कंपन्यांकडून राजकीय दबाव तंत्राचा वापर अत्यंत दुर्दैवी :- डॉ.गणेश ढवळे

बालाघाटावर सध्या पवनचक्की प्रकल्प उभरणा-या कंपन्यांचे पेव फुटले असुन परराज्यातील कंपन्या स्थानिक दलालांना हाताशी धरून अशिक्षित शेतकऱ्यांना लालुच दाखवून त्यांची दिशाभूल करून जमिनी ताब्यात घेत असुन पोलिस प्रशासनाच्या बळाचा गैरवापर करत दमदाटी करण्याचा प्रयत्न करत आहेत तसेच राजकीय लोकांचे कार्यकर्ते यांच्या मार्फत दबाव तंत्राचा वापर जमिनी बळकावण्यासाठी करत असल्याच्या तक्रारीत वाढ झाली आहे. राजकीय शक्तींचा वापर करून शेतकऱ्यांना खोटे गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या देत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. शेतक-यांच्या पाठीशी उभे राहण्याऐवजी आर्थिक लाभापोटी कंपन्यांची पाठराखण करताना दिसुन येत असल्याची खंत डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केली.

## परळीचे इंजि.राजू जगतकर यांची दुबई येथे बुलेट मेट्रो रेल्वेच्या असिस्टंट मॅनेजर पदी निवड




परळी प्रतिनिधी - मुंबई मेट्रो रेल्वेचे व्यवस्थापक इंजि राजू जगतकर यांची दुबई येथे बुलेट मेट्रो रेल्वेच्या असिस्टंट मॅनेजर पदी निवड झाल्याबद्दल परळी येथील त्यांच्या गावात आनंद साजरा केला जात आहे. त्यांच्या निकटवर्तीय मित्र मंडळी यांनी सुगंधकुटी बुद्धविहार या ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती च्या पदाधिकारी व भिमनगर,जगतकर गल्ली येथील ज्येष्ठ नागरिकांनी त्यांच्या हस्ते निवड झाल्याबद्दल शाल,हार, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला, पत्रकार बालाजी जगतकर यांचे छोटे बंधू आहेत, तसेच पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या या प्रसंगी या भागातील अनेक, युवक,तरुण,ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

## राष्ट्रवादीची शिवस्वराज्य यात्रा; खा.सोनवणेंवर समन्वयाची धूरा

### लवकरच बीडमध्ये येणार शिवस्वराज्य यात्रा

**येवता/प्रतिनिधी**

बीड: राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने महाराष्ट्रभरातील प्रत्येक जिल्ह्यात 'शिवस्वराज्य यात्रा' धडकणार आहे. या यात्रेचा 'बीड जिल्हा समन्वयक' म्हणून पक्षातर्फे बजरंग सोनवणे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाने लोकसभा निवडणूकीत भाजपने पंकजा मुंडे यांची उमेदवारी जाहिर केल्यानंतर काही दिवस वेट अँड वॉच करून याठिकाणी पंकजा मुंडेंच्या विरोधात सक्षमपणे कोण निवडणूक लढवू शकतो, याची चाचपणी केली. यात खा.बजरंग सोनवणे यांचे नाव आघाडीवर होते. यानंतर बजरंग सोनवणे यांना उमेदवारी देण्यात आली आणि सोनवणे यांना जिल्हाभर असलेला संपर्क कामी आला. यातून पक्षाला मोठे यश मिळालेले असल्याने बजरंग सोनवणे यांचे पक्षातही वजन वाढलेले आहे. आता राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने महाराष्ट्रभरातील प्रत्येक जिल्ह्यात 'शिवस्वराज्य यात्रा' काढण्यात येणार आहे. यासाठी पहिल्या टप्प्यात राज्यातील सहा जिल्ह्यांची निवड करण्यात आलेली असून यात पुणे-खा.अमोल कोल्हे, सोलापूर-खा. धैर्यशील मोहिते पाटील, धाराशिव-राहूल मोटे, लातूर-बसवराज पाटील नागराळकर, बीड-खा.बजरंग सोनवणे, जालना-आ.राजेश टोपे यांच्या खांद्यावर समन्वयाची धुरा देण्यात आलेली आहे.छत्रपती शिवरायांची पावनभूमी असणाऱ्या जुन्नर तालुक्यातील शिवनेरी किल्ला येथून या यात्रेचा शुभारंभ होणार आहे. दरम्यान, लवकरच बीड जिल्ह्यातही या यात्रेचे भव्य आयोजन करण्यात येईल. शिवस्वराज्य यात्रा महाराष्ट्राच्या स्वाभिमानाची, अस्मितेची यात्रा आहे. ही यात्रा बीड जिल्ह्यात अतिभव्य आयोजनात पार पडेल, हा विश्वास देतो, अशी प्रतिक्रिया खा.बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केली.

## अमळनेर ते विधनवाडी नविन रेल्वे लोहमार्गाची आज होणार चाचणी

बीड दि. ८ : अमळनेर ते विधनवाडी दरम्यान नविन रेल्वे लोहमार्गाची जलदगती चाचणी आज (शुक्रवारी) होणार आहे. अमळनेर ते विधनवाडी या नविन लोहमार्गाची जलदगती चाचणी होणार आहे. त्यामुळे सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० या कालावधीत नागरिकांनी रेल्वे मार्गापासून दूर रहावे. तसेच गुरे, पाळीव प्राणी इत्यादी रुळावर येणार नाहीत याची काळजी घ्यावी. लोहमार्गालगत कोणीही वावरू नये अथवा ओलांडू नये. याबाबत गावाच्या सरपंचांनी गावकऱ्यांना कळवावे. याबाबत सतर्क सूचना उपमुख्य अभियंता निर्माण अहमदनगर यांनी दिलेल्या आहेत.

## चंद्रकांत पाटील कोथरूड साठी धावून आले

**पुणे/प्रतिनिधी**

पुणे विभागात सतत पाऊस आणि खडकवासला धरणाचा विसर्ग यामुळे शहरात अनेक ठिकाणी पाणी घूसले होते या परिस्थितीत स्थानिक प्रशासन कमी पडले असतांनाही अनेक सामाजिक संघटना पूढे येऊन जनतेच्या समस्या करिता धावून आलेल्या दिसल्या यात कोथरूड मतदार संघात पूरग्रस्त भागातील विद्यार्थासाठी विद्यार्थ्यांचे नूकसान होऊ नये म्हणून लोकसहभागातून पाठ्यपुस्तकांसह शालेय साहित्य वाटप आणि जेष्ठ कलाकारासाठी विरंगूळा केंद्र ,विद्यार्थ्यासाठी शैक्षणिक वाचनालय,तसेच पुरग्रस्तांसाठी कोथरूड संघातील नागरिकांना भेडसावणारे समस्या



बाबत महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण वस्त्रोद्योग मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी सतत पूढाकार घेऊन यावेळी पूरग्रस्त नागरिका करिता संसारोपयोगी वस्तू, किराणा ,कपडे राहण्याची व्यवस्था उपलब्ध करून दिल्या•चंद्रकांत पाटील हे मंत्री असतांना यांचे कार्य आणि जनतेच्या समस्या जाणून घेण्याची क्षमता आणि यांचे कार्य पाहता जनता यांचे आभार मानत आहे•

## संविधान अमृत महोत्सवी वर्षा निमित्त संविधान जागर समिती महाराष्ट्र च्या माध्यमातून ९ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर संविधान जागर यात्रेचे आयोजन

**बोरघर / माणगाव /प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या राज्यघटनेचा अमृत महोत्सव सुरु असून याच अभिमानास्पद क्रांतिकारक अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधित' संविधानाचा ' गजर घराघरात पोहचावा म्हणून येत्या 9 ऑगस्ट ते 8 सप्टेंबर असा महाडचे ऐतिहासिक चवदार तळे ते भिम अनुयायांचे शक्तिपीठ असलेली दादरची चैत्यभूमि अशी संविधान जागर यात्रा निघणार असून केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते संविधान जागर यात्रेचे उदघाटन होणार आहे.

सदर संविधान जागर यात्रेत भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मान्यवर उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती एडव्होकेट वाल्मिक निकाळजे यांनी दिली. या वेळी त्यांच्या सोबत




संयोजक जयभिम आर्मीचे प्रदेश अध्यक्ष नितीन मोरे, राजेंद्र गायकवाड, संजय कांबळे, शरद कांबळे, योजना ठोकळे, स्नेहा भालेराव, आकाश अंभोरे उपस्थित होते. या संदर्भात जयभिम आर्मीचे महाराष्ट्र अध्यक्ष नितीन मोरे पुढे म्हणाले कि, महाराष्ट्र राज्यातील फुले, शाहू, आंबेडकरी चळवळीतील सुमारे 250 विविध पक्ष, संघटना, संस्था, मंडळे यांनी एकत्रीत येऊन काही बैठकांद्वारे चिंतन करून संविधान जागर समिती, महाराष्ट्र स्थापन केली असून त्याच माध्यमातून हि संविधान जागर यात्रा ९ ऑगस्ट ला सुरू होणार आहे. यास भारतीय जनता पार्टी व महायुतीचे घटक पक्ष यांचा संपूर्ण पाठींबा आहे. तसेच राज्यातील फुले- शाहू-आंबेडकरी विचाराचे आण्णा भाऊ साठे विचाराचे आणि आदिवासी भटके व विमुक्त संघटना व चळवळी आणि विचारवंत लेखक, साहित्यीक यांचाही सक्रिय पाठिंबा आहे. भारताचे संविधान व त्यातील मौलिक व मूलभूत तत्वे, संविधान कधीच कोणीच बदलू शकत नाही याची संविधानातच असलेल्या भक्कम तरतूदी याबद्दल समाजाची व्यापक जागृती करण्यात येणार असून त्याबद्दलचे सर्वोच्च न्यायालयाचे सर्व न्याय निवाडे याची सविस्तर माहिती समाजाला देण्यात येणार आहे. भारताचे संविधान भारतात लागू झाल्यापासून ज्या ज्या चुकीच्या घटना दुरुस्त्या (संविधान संशोधने) ज्यांनी केल्या आणि संविधानातील मूलभूत आधिकारांची चौकट व लोकशाही यांची हत्या करून ती कायमची नष्ट करून देशावर जबरदस्तीने हुकूमशाही लादण्याचा प्रयत्न करणार्यांचे संपूर्ण पोलखोल या संविधान जागर यात्रेद्वारे करण्यात येणार आहे.

## श्रावणातला पहिला सण नागपंचमी

आपल्या देशात सणांना खूप महत्त्व आहे, त्यातील श्रावणातील पहिला व महत्त्वाचा सण म्हणजे नागपंचमी. नागपंचमीच्या दिवशी नागाची पूजा करून प्रसन्न करणे हे फार वर्षापासून चालू आहे, नागपंचमी करण्यामागे खूप जुन्या कथा सांगितल्या जातात, त्यात काही पुराणातील तर काही दंतकथा ही आहेत. पुराणातील कथेप्रमाणे तक्षक नागाच्या अपराधाला सजा देण्यासाठी राजा जनमेनजयानं सर्पयज्ञ सुरू केला, त्याने सर्व सापांची आहुती देणे चालू केलं ,तेव्हा तक्षक नाग आपला जीव वाचविण्यासाठी इंद्राच्या आश्रयाला गेला,अपराध्याला अभय देणे हा सुद्धा अपराध आहे म्हणून जनमेनजय राजाने इंद्राची आहुती दिली, तेव्हा अगस्त ऋषी ने तप करून जनमेनजयाला प्रसन्न केले,इच्छित वर माग असे सांगितलेल्यावर सर्पयज्ञ थांबवावा अशी विनंती केली, राजाने यज्ञ थांबवला आणि तक्षकाचे प्राण वाचले, तो दिवस होता श्रावण शुद्ध पंचमीचा. दुसरी कथा आहे द्वापारयुगातील श्रीकृष्णाने यमुना नदीच्या डोहात कालिया मर्दन केले, तो शरण आला तेव्हा त्याला कोणत्याही प्राण्याला इजा न करण्याचे वचन घेऊन अभयदान दिले तोही दिवस होता श्रावण शुद्ध पंचमी, म्हणून या दिवशी नागपंचमी हा सण साजरा होतो, साप सुद्धा या दिवशी कोणालाही इजा करत नाही . दंतकथेप्रमाणे फार वर्षापूर्वी एका गावात एक शेतकरी आपल्या दोन मुले, एक मुलगी आणि पत्नी सोबत राहत होता. एकदा शेतकरी शेतात नांगरत असताना नांगराच्या फालात नागिनीची तीन पिल्लं मरतात ,क्रोधीत होऊन नागिन बदला घेण्यासाठी रात्री अंधारात शेतकऱ्याच्या दोन्ही मुलांना दंश करून मारते,सकाळी परत येऊन मुलीला चावणार इतक्यात ती मुलगी दुधाची वाटी नागिनी समोर ठेवून माफी मागते, मुलीची श्रद्धा पाहुन नागिन प्रसन्न होऊन तिला अभयदान देते आणि तिच्या दोन्ही भावांना परत जिवंत करते, हा पण दिवस होता श्रावण शुद्ध पंचमीचा, म्हणून नागपंचमीला नागाला दुध दिले जाते. खरंतर नाग दुध पीत नाही,नागाच्या शरीररचनेनुसार नागाच्या पोटात दुध गेलं तर नाग अशक्त होऊन मरुन जातो, म्हणून नागाला दुध पाजू नये. सरकारने याबाबत गांभीर्याने विचार करुन नागपंचमीच्या दिवशी गारुड्यांना बंदी घातली आहे .

सर्वात जुनी कथा आहे सत्वेश्वरी देवीची. पाच युगांपूर्वी सत्वेश्वरी नावाची एक कनिष्ठ देवी होती, एकदा तिचा भाऊ सत्वेश्वर याला नागपंचमीच्या आदल्या दिवशी सर्पदंश होऊन मृत्यू आला. त्यामुळे भावाच्या शोकात सत्वेश्वरीने दिवसभर अन्नग्रहण केले नाही तिला उपवास घडला म्हणून स्त्रिया भावाच्या उदंड आयुष्यासाठी उपवास करून देव व नागदेवातेला साकडे घालतात . सत्वेश्वरीला दृष्टान्त झाला की तिचा भाऊ नागजन्मात गेला आहे. ती जंगलात सैरावैरा फिरत भावाला शोधू लागली ,कुठेही दिसेना म्हणून उंच झाडावर चढून शोधू लागली, तिची ती अवस्था बघून नागरुपात भावाने तिला तिथेच दर्शन दिले, त्यामुळे त्याच नागाला तिने भाऊ मानले व आनंदानं झाडाच्या फांद्याना झोके घेऊ लागली, आजपर्यंत स्त्रिया त्याचमुळे या दिवशी नागाला भाऊ मानून त्याची पुजा करतात, व त्या दिवशी झाडाला झोके घेतात . सत्वेश्वरी भावाच्या दुःखात निस्तेज झाली होती, तिला आनंदी करण्यासाठी नागाने वस्त्रे व अलंकार दिले, म्हणून या दिवशी स्त्रिया नवीन कपडे व अलंकार घालतात . तो आता परत जाऊ नये असे वचन तिने मागितले तेव्हा नागाने आपला फणा तिच्या हातावर ठेवून वचन दिले, तेव्हा तिच्या हातावर लाल रंगाचे प्रतिक उठले म्हणून त्यादिवशी मुली व स्त्रीया हातावर मेहंदी काढतात आपल्या प्रत्येक सणांमध्ये केलेल्या पारंपारिक प्रथेमागे काहीतरी इतिहास हा आहेच उगाच थोतांड नाही , जसे नागपंचमीला दुध देणे-माफी मागणे उंच झोका घेणे-भावाची कीर्ती उंचावर जाण्यासाठी प्रार्थना करणे. हातावर मेहंदी काढणे-भावा-बहिणीने एकमेकांना न सोडण्याचे वचन देणे नवे वस्त्रे धारण करणे- एकदुसऱ्याला सुखी व आनंदी ठेवणे,आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे नाग-साप यांचे संरक्षण करणे त्यांना अभय देण्याचे वचन घेणे . तसा साप हा शेतकऱ्यांचा मित्रच आहे, तो शेताच (क्षेत्र ) पालन करतो म्हणून त्याला क्षेत्रपाल ही नाव आहे . आज भारतात ठिकठिकाणी सर्पमित्र नावाने संस्था आहेत त्यांचे करावे तितके कौतुक कमी आहे. भगिनींनो, तुम्ही योग्य त्या मंदिरात अथवा आपल्या घरीच पाटावर नागाची प्रतिमा काढून मनोभावे नागपंचमी साजरी करु शकता, मात्र नागाकडुन भावाच्या रक्षणासाठी वचन घेता तसे आपल्या भावाकडूनही नाग रक्षणासाठी वचन घ्या, हिच खरी नागपंचमी.

अजय शिवकर
केळवणे पनवेल
७९७७९५०४६४

## सौ.आरती वर्धमान बोराणा याच्या ११ उपवासाची शनिवारी पचकावणी

**(बीड प्रतिनिधी)**

बीड तालुक्यातील चौसाळा येथील पावन भूमी मध्ये परमपूज्य श्री दिलीपकवरजी म.सा. यांच्या सुशिष्या स्वाध्याय प्रेमी परमपूज्य श्री कुसुमकँवरजी म.सा. आणि प्रवचन प्रभाविका परमपूज्य श्री अरुणप्रभाजी म.सा. आधी ठाणा २ यांच्या सानिध्या मध्ये सौ आरती वर्धमान बोराणा रा.तेरखेडा ता.वाशी जि.धारशिव यांनी निरंकार 11उपवास केले असून त्याची पचकावणी शनिवार दि.10/08/२०२४ रोजी चौसाळा येथे होणार आहे



चौसाळा सारख्या छोट्या गावामध्ये जैन समाजाचे कमी घरे असताना २४ वर्षानंतर चातुर्मासचा योग आला सध्या एकासना ,आंबील ,वास ,तेला, आठाई अशा बऱ्याच तपस्या चालू आहेत सौ.आरती बोराणा लोग्गस अराधक श्री कांतिलाल बोराणा यांच्या सुन व चौसाळयाचे श्रीमती कमल जवाहरलाल खिवंसरा यांची मुलगी आहे ते अपल्या माहेरी चातुर्मास आहे 11उपवास करु श्री वर्धमान जैन स्थानक चौसाळा येथे ९:०० (नऊ वाजता) त्यांची पचकावणी होणार आहे चातुर्मास चे मार्गदर्शक सुभाषचंद बेदमूथा आणि अशोक लोढा आहेत पचकावणी झाल्यानंतर गौतम प्रसाद ठेवलेला आहे लाभार्थी संजय कांतीलाल बोराणा तेरखेडा अशी माहिती चातुर्मास कमिटी अध्यक्ष आनंद नहार, संदेश खिवंसरा, नितीन लोढा, वृषभ धोका ,उमेश लोढा ,सतीश कोचर, आनंद लोढा ,भूषण खिंवसरा, मयूर नहार , रोशन खिंवसरा, रमण कोचर, राजेश लोढा, पारस धोका ,अनुप बेदमुथा, विनोद धोका, संतोष लोढा, देवेंद्र बोरा आणि श्री वर्धमान जैन श्रावक संघ चौसाळा यांनी दिली आहे.

# बांगलादेशातील हिंदू आणि मंदिरे यांच्या रक्षणासाठी भारत सरकारने तातडीने पावले उचलावीत-हिंदु जनजागृती समिती.

**उरण/प्रतिनिधी**

बांगलादेशातील आरक्षणाच्या सूत्रावरून प्रारंभ झालेल्या हिंसाचाराने आता टोक गाठले आहे. या हिंसाचाराचे रूपांतर आता अराजकतेत झाले आहे. सरकारविरोधी आंदोलन हे आता हिंदूंच्या विरोधात प्रारंभ झाले आहे. जाणीवपूर्वक हिंदूंना लक्ष करून त्यांच्या उघडपणे हत्या करणे, हिंदूंच्या घरांवर आक्रमणे करणे, हिंदूंची दुकाने लुटणे, हिंदूंच्या मंदिरांची तोडफोड करणे-आग लावणे, हिंदु महिलांवर बलात्कार करणे, हिंदूंना विस्थापित करणे आदी अत्याचार केले जात आहे. या गोष्टींमुळे तेथील अल्पसंख्यांक हिंदूंमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण आहे. या संदर्भात बांगलादेशी सैन्यदलाने जरी हिंदूंचे रक्षण करण्याचे आश्वासन दिले असेल, तरी भारत सरकारने त्यावर विसंबून न रहाता हिंदु समाजाच्या आणि मंदिरांच्या रक्षणासाठी तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्याकडे केली आहे.

बांगलादेशातील हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर हिंदु जनजागृती समिती पुढील मागण्या केल्या आहेत. प्रथम बांगलादेशातील हिंदूंवरील हल्ले, घरांची लूट, मंदिरांवरील हल्ले, मूर्तींची तोडफोड, महिलांवरील अत्याचार थांबवण्यासाठी तेथील सैन्य दलाला कठोर सूचना द्याव्यात. बांगलादेशातील हिंदूंवरील वाढते हल्ले लक्षात घेता तेथील हिंदूंना सुरक्षित ठिकाणी हलवावे आणि त्यांना तातडीने सुरक्षा पुरवावी. आतापर्यंत तेथील हिंदूंच्या जीवित वा मालमत्ता यांची जी हानी झाली असेल, त्याची तातडीने भरपाई करावी. भारत सरकारने हा विषय तातडीने 'संयुक्त राष्ट्र संघा'त मांडून बांगलादेशामध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या शिष्टमंडळाला भेट देण्याची मागणी करावी. बांगलादेशातील हिंसाचारामुळे तेथील जे हिंदु विस्थापित होऊन भारतात आश्रय मागत असतील, त्यांना 'नागरिकत्व सुधारणा कायद्या'द्वारे (सीएए) भारत सरकारने आश्रय द्यावा. तसेच यापूर्वीही जवळपास ५ कोटी बांगलादेशी घुसखोर भारतात शिरले आहेत, या घटनेनंतर पुन्हा ही घुसखोरी वाढण्याची शक्यता पहाता भारतीय सीमेवर चोख बंदोबस्त करावा.

'सोशल मिडीया'च्या माध्यमातून बांगलादेशातील अत्याचाराचे जे भयंकर व्हिडिओ समोर येत आहेत, त्यावरून भारत सरकारने वेळीच लक्ष घातले नाही, तर बांगलादेश हा दुसरा पाकिस्तान होण्याची शक्यता आहे. या ठिकाणी हिंदूंचा मोठ्या प्रमाणात नरसंहार होण्याची शक्यता आहे. या घटनेनंतर धर्मांध जिहादी आतंकवाद्यांचे मनोबल वाढून ते भारतातही त्याच्या छुप्या पाठिराख्यांच्या मदतीने हिंसाचार माजवण्याची शक्यता आहे. त्यामुळे भारतीय पोलीस यंत्रणा, प्रशासन यांच्यासह समस्त भारतियांनी सतर्क रहायला हवे. तसेच स्वसंरक्षणासाठी सिद्ध रहाण्याचीही आवश्यकता असल्याचे समितीने म्हटले आहे.

## पिक कर्ज मागणीसाठी किसान सभेची परळी तहसील कार्यालयावर निदर्शन

**परळी/प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज मिळावे, शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर लावलेले होल्ड काढावेत, वाण धरणावरील वीज पंपाची तोडलेली वीज तात्काळ जोडून द्यावी, मागच्या वर्षीचा पिक विमा शेतकऱ्यांच्या खात्यात तात्काळ जमा करावा व शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी. या मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या वतीने गुरुवार दि ८ रोजी परळी तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांनी निदर्शने केली. या आंदोलनाचे नेतृत्व किसान सभेचे जिल्हा अध्यक्ष कॉ.एड.अजय बुरांडे यांनी केले. राज्य व केंद्र सरकार शेतकऱ्यांना विविध योजनेतुन फायदा देत असल्याच्या जाहिराती वर करोडोचा खर्च करीत असताना राष्ट्रीयकृत बँका शेतकऱ्यांना त्रास देत आहेत. शेतकऱ्यांना वेगवेगळ्या मार्गाने अडवणुक करण्याचे काम बँक प्रशासन करीत आहेत. यापुढे बँकानी शेतकऱ्यांची अडवणुक केल्यास संबंधित बँकाच्या विरोधात आंदोलन करण्याचा इशारा कॉ अजय बुरांडे यांनी दिला आहे.याप्रसंगी किसान सभेचे जिल्हा सचिव कॉ. मुरलीधर नागरगोजे, कॉ सुदाम शिंदे, कॉ भगवान बडे, कॉ मुक्तेश्वर कडभाने, धनंजय सोळंके, कॉ मनोज देशमुख, कॉ पप्पु देशमुख, कॉ मनोज स्वामी, कॉ विष्णु देशमुख आदींची प्रमुख उपस्थिती होती. या आंदोलनात तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी शेतकऱ्यांच्या घोषणेनी तहसीलचा परिसर दणाणुन गेला होता. मागण्यांचे निवेदन नायब तहसीलदार बाबुराव रुपनर यांना देण्यात आले.



पिक कर्ज व बँकाच्या समस्या संबंधी सहाय्यक निबंधक, राष्ट्रीयकृत बँकांचे अधिकारी व किसान सभेचे पदाधिकारी यांची परळी तहसील कार्यालयात १३ ऑगस्ट रोजी बैठक बोलाविण्यात आली असल्याचे तहसील प्रशासनाने किसान सभेला पत्र दिले आहे.

## परळीचे इंजि.राजू जगतकर यांची दुबई येथे बुलेट मेट्रो रेल्वेच्या असिस्टंट मॅनेजर पदी निवड झाल्याबद्दल सत्कार

परळी/प्रतिनिधी मुंबई मेट्रो रेल्वेचे व्यवस्थापक इंजि राजू जगतकर यांची दुबई येथे बुलेट मेट्रो रेल्वेच्या असिस्टंट मॅनेजर पदी निवड झाल्याबद्दल परळी येथील त्यांच्या गावात आनंद साजरा केला जात आहे. त्यांच्या निकटवर्तीय मित्र मंडळी यांनी सुगंधकुटी बुद्धविहार या ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती च्या पदाधिकारी व भिमनगर,जगतकर गल्ली येथील ज्येष्ठ नागरिकांनी त्यांच्या हस्ते निवड झाल्याबद्दल शाल,हार, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला, पत्रकार बालाजी जगतकर यांचे छोटे बंधू आहेत, तसेच पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या या प्रसंगी या भागातील अनेक, युवक,तरुण,ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

## परळीतील अवैध धंदे बंद करा! १५ ऑगस्ट रोजी जिल्हा कचेरी समोर आमरण उपोषण-शेख मुस्तफा

**परळी/प्रतिनिधी**

परळी शहरातील प्रशासनाच्या संगनमताने होत असलले अवैध धंदे तत्काळ बंद करावेत ह्या साठी एआयएमआयएम (ईनक़लाब) पक्षाच्या वतीने बीड जिल्हाअधिकारी कार्यालय समोर १५ ऑगस्ट २०२४ स्वतंत्र दिवशी आमरन उपोषण करणार शेख मुस्तफा भाई, बीड जिल्हा अध्यक्ष (एआयएमआयएम) ईंनक़लाब पार्टी, परळी शहरात प्रशासनाच्या संगनमताने अवैध धंदे जोरात चालू आहे,जसे की, बिंगो,गुटका, मटका,अवैध सावकारी,दारू,गांजा, क्लब, असे अनेक धंदे सरोस चालू आहे,जेणेकरून युवा पिढी मोठ्या प्रमाणात आत्महत्या करत आहेत व अनेक कुटुंब ऊधवसत होत आहे,ह्याची आंधळया प्रशासनाला कसल्याही प्रकारचे देनेघेने नाही, हे की




येणारया १३ ऑगस्ट २०२४ पर्यंत परळी शहरातील अवैध धंदे बंद करण्यात यावे नाही तर १५ ऑगस्ट २०२४ स्वतंत्र दिवशी बीड जिल्हा अधिकारी कार्यालय समोर ऑल इंडिया मजलिसे इंक़लाबे मील्लत या पक्षाच्या वतीने आमरन उपोषण करण्यात येईल, व पुढील होणारया परिणामांची जबाबदारी प्रशासनाची राहील.

# जिद्द, चिकाटी आणि मेहनतीने गरीब कुटुंबातील तांड्यावरचा मुलगा झाला PSI.

**गेवराई/प्रतिनिधी**

गेवराई तालुक्याचे भूमिपुत्र, पाचेगाव पंचक्रोशीतून अत्यंत गरीब कुटुंबातून ,आई-वडिलांची परिस्थिती बेताची अशा परिस्थितीतही जिद्द ,चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर यश खेचून आणणारा बंजारा समाजाचा जयराम तांड्याचा हिरा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये पोलीस उपनिरीक्षक (PSI) या पदासाठी निवड झाली असून ,चिरंजीव राहुल शेषेराव राठोड यांचे समस्त बंजारा समाज बीड जिल्हा यांच्यावतीने कौतिक व अभिनंदन...करण्यात आले. तसेच आपल्या पोटाला चिमटा घेऊन आपल्या पाल्याला शिक्षणासाठी प्रेरित करणारे सर्वगुणसंपन्न आदर्श मातापिता श्री शेषराव राठोड व त्यांच्या पत्नी यांचे सुद्धा कौतुक खूप करण्यात येत आहे . प्रशासनाच्या सेवेमध्ये आपण आपला अनमोल हिरा समाजाच्या सेवेसाठी दिल्याबद्दल बंजारा समाजाला आपला सार्थ अभिमान आहे..... सध्याच्या तरुण पिढीला आदर्श वाटावा असा यश संपादन चिरंजीव राहुल यांनी केले आहे.... युवा पिढीने व्यसनाची नशा न करता शिक्षणाची नशा केल्यास निश्चितच यश मिळते हे राहुलने दाखवून दिले आहे.....



युवा पिढीने आई-वडिलांच्या परिस्थितीचा विचार करून चिरंजीव राहुल दादा सारखे अभ्यास करून प्रशासकीय सेवेमध्ये मोठे यश मिळू शकते हे आज सिद्ध झाले आहे....

सध्याच्या काळामध्ये शिक्षणच हे असे साधन आहे की, आपण आपल्या पिढीचे व उद्याच्या पिढीचा विकास करू शकतो....

त्यासाठी प्रत्येकाने शिक्षणाची कास धरली पाहिजे.. ग्रामीण भागातील परिस्थिती पाहता आपल्या पाल्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण देऊन, त्याबरोबर संस्कार पण चांगले देणे गरजेचे आहे .....यासाठी गावातील सर्व सुजान नागरिकांनी लक्ष देऊन ज्या ठिकाणी ज्ञान मिळते अशा शाळेचे वेगवेगळे साहित्य, पुस्तके देऊन विद्यार्थी व नागरिकांच्या ज्ञानात भर पडेल त्यातून सामाजिक ,शैक्षणिक, आर्थिक, राजकीय विकास कसा होईल.... याकडे लक्ष द्यावे . आयुष्यातील सगळ्यात मोठा आनंद आज राहुलच्या आई-वडिलांना झाला असेल कारण श्री शेषराव राठोड हा गरिबीतला माणूस आपुलकी, जिव्हाळा आणि प्रेमाने वागणारा नियतीने आज त्याला PSI चा बाप होण्याची संधी दिली... अशी संधी समाजाच्या प्रत्येक बापाच्या वाट्याला वेगवेगळ्या पदाच्या माध्यमातून येवो.. अशी अपेक्षा त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना दिली आहे.

# शिवसेनेच्या भगवा सप्ताह ५ वा दिवस शिरपुरा तालुका केज येथे शिवसेना शाखा उद्घाटन संपन्न


**केज/प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे साहेब, युवासेनाप्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब यांच्या आदेशानुसार, शिवसेना नेते सुनिलजी प्रभू साहेब, शिवसेना उपनेते मराठवाडा समन्वयक विश्वनाथजी नेरूरकर, शिवसेना उपनेत्या प्रा.सुषमाताई अंधारे, लोकसभाप्रमुख सुनिल दादा धांडे, सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे, यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि.०८/०८/२०२४ रोजी भगवा सप्ताहात पाचवा दिवशी शिवसेना बीड संपर्कप्रमुख परशुराम जाधव साहेब,व जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आज शिवसेना तालुकाप्रमुख अशोक जाधव युवा सेना तालुका प्रमुख किशोर घुले यांच्या आयोजनात शिरपुरा येथे शिवसेना शाखा उद्घाटन सोहळा पार पडला यावेळी उपस्थित शिवसेना जिल्हा सचिव रोहित दादा कसबे युवा सेना विधानसभा प्रमुख ज्ञानेश्वर बोबडे उपतालुकाप्रमुख अभिजित घाटुळ शाखा प्रमुख पदी विनायक धनवे उप शाखा प्रमुख कैलास घुले शाखा सचीव कृष्णा केदार सहसचिव फुलचंद वनवे संघटक बळीराम गायकवाड कोष अध्यक्ष सहदेव घुले सल्लागार श्रीमंत बप्पा घुले मार्गदर्शक रामदास घुले आदि उपस्थित होते.





## विविध आपत्तीसंदर्भात जनजागृती मॅरेथॉन रॅलीस उत्स्फूर्त प्रतिसाद





**जालना प्रतिनिधी** विविध आपत्ती संदर्भात जनजागृतीसाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्यावतीने जालना शहरातून काढण्यात आलेल्या मॅरेथॉन रॅलीस खेळाडुंचा उत्स्फूत प्रतिसाद लाभला. या रॅलीत विविध शाळा, महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांसह राष्ट्रीय कॅडेट कोअर, राष्ट्रीय सेवा योजना, होमगार्ड व स्काऊट गाईडचे विद्यार्थ्यांनी मोठया संख्येने सहभाग घेतला. आज सकाळी ७.०० वाजता जालना शहरातील मंठा चौफुली येथून मॅरेथॉन रॅलीस तहसीलदार छाया पवार यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून प्रारंभ झाला. यावेळी क्रीडा अधिकारी डॉ. रेखा परदेशी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी दिपक काजळकर उपस्थित होते. प्रारंभी सर्व सहभागी विद्यार्थी, खेळाडू यांची नोंदणी करण्यात आली. सहभागी खेळाडुंना प्रमाणपत्र, टि-शर्ट व कॅप देण्यात आली होती. या मॅरेथॉन स्पर्धेत मुलांमधून जेईएस महाविद्यालयाचा नितीन दिलीप पवार याने प्रथम, क्रीडा प्रबोधिनीचा आकाश रामेश्वर राठोड याने व्दितीय आणि पार्थ सैनिकी शाळेचा मोहित चरणसिंग मेहेर या विद्यार्थ्याने तृत्तीय क्रमांक मिळवला. तर मुलींमधून अंकुशराव टोपे महाविद्यालयाची गिता रामेश्वर राठोड प्रथम, जेईएस महाविद्यालयाची अंजली दत्ता लघुखरे द्वितीय आणि अंकुशराव टोपे महाविद्यालयाची विद्यार्थीनी प्रिती समाधान शिंदे हिने तृत्तीय क्रमांक मिळवला. या सर्व विजेत्या खेळाडुंना दि. १२ ऑगस्ट २०२४ रोजी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात येणार आहे.

# घरोघरी तिरंगा अभियानानिमित्त ९ ऑगस्ट रोजी सायकल रॅली मामा चौकातून सकाळी ७.०० वा. सुरू होणार रॅली रॅलीत सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन

**जालना प्रतिनिधी**

दि. ९ ते १५ ऑगस्ट या कालावधीत "घरोघरी तिरंगा अभियान" राबविण्यात येणार आहेत. यानिमित्त दि. ९ ऑगस्ट रोजी सकाळी ७.०० वा. महानगरपालिकेच्यावतीने शहरात सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. मामा चौक येथून सुरुवात होणाऱ्या या रॅलीचे उदघाटन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते होणार आहे. रॅलीत सहभागी होण्यासाठी नागरिकांनी आपल्या सायकलीसह मामा चौक येथे सकाळी ७.०० वाजेपुर्वी उपस्थित राहावे. सायकल रॅली ही तिरंगा रॅली असेल. प्रत्येकाने आपापल्या सायकलवर तिरंगा ध्वज लावायचा आहे. तिरंगा ध्वज महापालिकेच्यावतीने पुरवण्यात येईल. सायकल रॅली ही मामा चौक येथून सुरू होऊन उडपी हॉटेल, छत्रपती शिवाजी चौक, पाणीवेस, मंमादेवी, गांधी चमन, रेल्वे स्टेशन मार्गे अंबड चौफुली येथे समारोप होईल. रॅलीत मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर यांनी केले आहे. महाराष्ट्रात घरोघरी तिरंगा अभियान दि. ९ ते १५ ऑगस्ट या दरम्यान राबविण्यात येणार आहे. केंद्र शासनाने सन २०२२ पासून हर घर तिरंगा (घरोघरी तिरंगा) अभियान सुरु केले. यावर्षी या अभियानाचे हे तिसरे वर्ष आहे. सर्व नागरिकांना आपल्या घरांवर त्यासोबतच, शासकीय, निमशासकीय कार्यालये, खासगी आस्थापना, संस्था, संघटना कार्यालय या सर्वांना या अभियानात सक्रिय सहभागी होत दि. १३ ते १५ या कालावधीत तिरंगा ध्वज लावता येणार आहे. सर्व नागरिक शासकीय, निमशासकीय कार्यालये, खासगी आस्थापना, संस्था, संघटना कार्यालय या सर्वांना या अभियानात सक्रिय सहभागी होता येणार आहे.

# लाडकी बहिण योजनेसाठी पैसे आहेत आणि मोबदला देण्यासाठी: सर्वोच्च न्यायालयाचा राज्य सरकारला सवाल

## नेमकं प्रकरण काय?

सेवानिवृत्त वन अधिकारी टीएन गोदावर्मन यांनी वनजमीनीच्या संरक्षणावरून चिंता व्यक्त केली होती आणि त्यासंदर्भात जनहित याचिका दाखल केली होती. वनजमिनीवरील उत्खनन आणि बांधकाम कोणत्याही पर्यावरण मंजुरीशिवाय करण्यात आले होते. या प्रकरणाची सुनावणी अजूनही सुरू आहे. याचअनुषंगाने सर्वोच्च न्यायालयाने १९५० मध्ये पुण्यातील २४ एकर जमीन खरेदीसंदर्भात हे मत मांडले. राज्य सरकारने या जमिनीवर ताबा मिळवला होता. आणि त्यानंतर ही जमीन संरक्षण संस्थेला देण्यात आली. तत्पूर्वी न्यायालयाने राज्य सरकारला फटकारत राज्याची कृती ही एका व्यक्तीच्या खासगी मालमत्तेवर अतिक्रमण करणारी असल्याचे म्हटले होते. राज्याने पुरेशी खबरदारी घ्यायला हवी होती, असे न्यायालयाने सांगितले.



आगामी विधानसभा निवडणुकीमुळे सध्या राजकीय वातावरण ढवळून निघालं आहे. राज्य सरकारकडून महिलांसाठी लाडकी बहिण योजनेची घोषणा करण्यात आली आहे. यात महिलांना दर महिन्याला १५०० रुपये दिले जाणार आहेत. आता यावरुनच सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारची कानउघडणी केली आहे. राज्य सरकारकडे लाडक्या बहिण योजनेसाठी पैसे आहेत, पण जमीन वाद प्रकरणात मोबादला देण्यासाठी पैसे नाहीत का? असा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाने विचारला आहे.आज सर्वोच्च न्यायालयात पुण्यातील एका वादग्रस्त जमिनीबद्दल एक महत्त्वपूर्ण सुनावणी पार पडली. पुण्यातील 24 एकर वादग्रस्त जमिनीबाबतच्या याचिकेवर ही सुनावणी होती. या सुनावणीदरम्यान न्यायाधीश बी आर गवई, संदीप मेहता आणि के व्हि विश्वनाथन यांच्या खंडपीठाकडून राज्य सरकारची चांगलीच कानउघडणी करण्यात आली. लाडक्या बहिण योजनेसाठी पैसे आहेत, पण जमीन वाद प्रकरणात मोबदला देण्यासाठी पैसे नाहीत का? असा प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला आहे.पुण्यातील 24 एकर वादग्रस्त जमिनीबाबतच्या याचिकेवर ही सुनावणी होती. राज्याने मोबदला म्हणून दिलेली जमीन ही वनविभागाच्या अंतर्गत आहे, असा आरोप याचिकाकर्त्यांकडून करण्यात आला होता. सरकारकडून 24 एकर जमीन संरक्षण विभागाला दिल्याचा दावा केला गेला. ही 24 एकर जमीन माझी असून त्यासाठी योग्य मोबदला राज्याकडून न मिळाल्याचा आक्षेप याचिकाकर्त्यांनी केला आहे.

## मुप्टा शिक्षक संघटनेच्या बीड जिल्हाध्यक्षपदी शरद मगर यांची निवड

**बीड/प्रतिनिधी**

मुप्टा शिक्षक संघटनेची महत्त्वपूर्ण बैठक मुप्टाचे संस्थापक सचिव नेते प्रा. सुनील मगरे यांच्या अध्यक्षतेखाली रविवार दिनांक 4 ऑगस्ट रोजी सिद्धार्थ महाविद्यालय मिटमिटा छत्रपती संभाजी नगर येथे संपन्न झाली. या बैठकीमध्ये प्रा. सुनील मगरे यांनी संघटने मधील विविध जिल्ह्यातील पदाधिकारी यांचे फेरबदल केले. संघटना बांधणी, शिक्षक प्राध्यापक यांच्या विविध प्रश्न,आंदोलनासंबंधी चर्चा ,संघटनेचे सातवे अधिवेशन यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

मुप्टा शिक्षक संघटनेच्या विभागीय कार्याध्यक्षपदी प्रा.प्रदीप रोडे व डॉ. भास्कर टेकाळे यांची नियुक्ती करण्यात आली. बीड जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष म्हणून जिल्हाध्यक्षपदी शरदराव मगर यांची निवड करण्यात आली. जिल्हा सचिव पदी प्रा.शशिकांत जावळे व कार्याध्यक्षपदी भैयासाहेब आदोडे यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी संघटनेचे नेते सुनील मगरे, डॉ.समीउल्ला खान डॉ. भास्कर टेकाळे यांच्या हस्ते नूतन पदाधिकारी यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी संघटनेचे पदाधिकारी राजेंद्र जाधव शेख मुनीर शिवराम मस्के पद्माकर कांबळे सुनील पांडे यांची उपस्थिती होती महाराष्ट्रातून संघटनेचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बीड जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष मा. शरदराव मगर यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून शुभेच्छा व कौतुक होत आहे.

## मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजनाः गरीब कुटुंबांना मिळणार ३ गॅस सिलेंडर मोफत योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी

**(जालना-प्रतिनिधी)**

राज्यातील गरीब कुटुंबांना वार्षिक तीन गॅस सिलेंडर मोफत देण्यासाठी मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजना राज्य शासनाने जाहिर केली आहे. या योजनेची अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या सुचनेनुसार अपर जिल्हाधिकारी रिता मेत्रेवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबरोबरच योजनेपासून कोणीही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही, याची दक्षता संबंधीतांनी घेण्याची सूचना श्रीमती मेत्रेवार यांनी केली.

बैठकीस जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर, सहा. जिल्हा पुरवठा अधिकारी श्री. डी.एस. दिवटे, ऑईल कंपन्यांचे सेल्स ऑफिसर, गॅस एजन्सीचे प्रतिनिधी व तहसील कार्यालयांचे कर्मचारी उपस्थित होते. मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना वार्षिक तीन मोफत गॅस सिलेंडरचे पुनर्भरण तेल कंपन्यांमार्फत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. लाभार्थ्यांची पात्रता या योजनेतंर्गत जिल्ह्यातील उज्वला योजनेचे लाभार्थी तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पात्र लाभार्थ्यांच्या कुटुंबाला वार्षिक ३ गॅस सिलेंडरचे पुनर्भरण (रिफिल) मोफत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. एका कुटुंबात (रेशन कार्डनुसार) केवळ एक लाभार्थी सदर योजनेस पात्र असेल. सदर लाभ केवळ १४.२ कि.ग्रॅ. वजनाच्या गॅस सिलेंडरची जोडणी असलेल्या गॅसधारकांना अनुज्ञेय राहील. क ा र्य प ६ द त ी सदर योजनेची सबसीडी लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये थेट लाभ हस्तांतरणाद्वारे (DBT) द्वारे जमा करण्यात येणार असल्यामुळे ई-केवायसी करणे आवश्यक आहे, असे जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती चौधर यांनी कळविले आहे.

## विधानसभेसाठी १०, ११, १७ व १८ ऑगस्टला विशेष मतदार नोंदणी अभियान

**नांदेड प्रतिनिधी**

नांदेड : यादयामध्ये अनेक मृतकांची नावे आहेत, गेल्या वेळी या मतदान केंद्रावर होते आता त्या मतदान केंद्रावर नाव कसे गेले, माझे नाव कालपर्यंत होते आज का वगळले आहेत, प्रशासनाने लक्ष दिले नाही” ,मतदानाच्या दिवशी असे आरोप करण्यापेक्षा २० ऑगस्टपर्यंतच्या मतदार यादीच्या दुसऱ्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षणाच्या कार्यक्रमांमध्ये भाग घ्या व आपल्या नावाची खातरजमा करा, असे आवाहन जिल्हा निवडणूक विभागाने केले आहे. मतदार यादीमध्ये आपले नाव नसेल तर नोंदणी करण्यासाठी 20 ऑगस्ट शेवटची तारीख आहे. थोडक्यात येत्या विधानसभेमध्ये मतदान करण्यासाठी आपली नावे मतदान यादीत आहे, हे माहिती करून घेण्यासाठी जिल्ह्यातील तमाम मतदारांना २० ऑगस्ट पर्यंत आपल्या हरकती व दावे नोंदवता येणार आहे. यासाठी २० ऑगस्टपर्यंत आपल्या नियमित मतदार केंद्रावर दररोज मतदान केद्र स्तरीय अधिकारी ( बीएलओ ) उपस्थित राहणार आहे. ३० ऑगस्टला ही प्रक्रिया पूर्ण होणार असून त्यानंतर अंतिम होणाऱ्या यादीतील मतदारांनाच विधानसभा निवडणुकीमध्ये मतदान करता येणार आहे, याची अतिशय गांभीर्याने नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. नांदेड जिल्ह्यातील किनवट,हदगाव,भोकर, नांदेड उत्तर, नांदेड दक्षिण, लोहा, नायगाव, देगलूर व मुखेड या नऊ विधानसभा मतदारसंघाच्या प्रारूप मतदार यादी तयार झाली आहे.नागरिकांना या यादीत काही दावे व हरकती असल्यास २० ऑगस्टपर्यत सादर करावेत,असे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे.

## मुप्टा बीड जिल्हाध्यक्ष शरद मगर यांच्या निवडीबद्दल सत्कार

बीड/प्रतिनिधी मुप्टा शिक्षक संघटनेचे नवनियुक्त बीड जिल्हाध्यक्ष शरद मगर यांचा सत्कार बीड शहरातील नीलकमल हॉटेलमध्ये संपन्न झाला. या सत्काराचे आयोजन प्रा.बाळासाहेब गव्हाणे यांनी केले होते. या सत्कार प्रसंगी मुप्टा शिक्षक संघटनेचे जूनियर विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रा.शशिकांत जावळे, मुप्टाचे विभागीय कार्याध्यक्ष (जूनियर विभागाचे) प्रा.बाळासाहेब गव्हाणे, बहुजन टीचर्स असोसिएशनचे जिल्हा सरचिटणीस महादेव इनकर प्रशांत वासनिक, क्रांतिकारी शिक्षक संघटनेचे प्रा.डॉ.शशिकांत गायकवाड , मुप्टाचे पाटोदा तालुकाध्यक्ष जयराम यादव आदी उपस्थित होते.

## पंचम ज्योतिर्लिंग वैद्यनाथ मंदिर परिसरात कायमस्वरूपी लोखंडी फाटक बसवा; अवजड वाहनांना परिसरात प्रवेश बंदी करा – अँड.मनोज संकाये

### परळी नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना निवेदन सादर!

**परळी वैजनाथ प्रतिनिधी**

भारतातील पाचव्या क्रमांकाचे ज्योतिर्लिंग म्हणून परळीच्या वैद्यनाथाला ओळखले जाते परंतु याच वैद्यनाथ मंदिर परिसरात नागरिकांचा ट्रॅफिक मुळे श्वास गुदमरतोय अशी खंत येथील सामाजिक कार्यकर्ते अँड.मनोज संकाये यांनी व्यक्त करत मंदिर परिसरामध्ये अवजड वाहनांना प्रवेश बंदी करून कायमस्वरूपी फाटक बसवण्याची मागणी केली. याबाबतचे निवेदन नगरपालिकेची मुख्याधिकारी श्री त्रंबक कांबळे यांना मनोज संकाये मित्र मंडळाच्या वतीने देण्यात आले. नगरपालिकेच्या प्रवेशद्वारावर मनोज संकाये मित्र मंडळाच्या वतीने निदर्शने करण्यात आली. दरम्यान निवेदन स्वीकारल्यानंतर येत्या दोन दिवसात अवजड वाहने जाऊ नयेत म्हणून फाटक बसविण्यासंदर्भात कार्यवाही करू अशी ग्वाही मुख्याधिकारी यांनी दिली.

निवेदनात म्हटले आहे की, वैद्यनाथ मंदिर परिसरामध्ये वाहनांची ट्रॅफिक मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे भाविक भक्तांना तेथे पायी चालता सुद्धा येत नाही त्यामुळे जिल्ह्यातून तसेच राज्यातून आलेल्या भाविक भक्तांचे गैरसोय होत आहे. अवजड वाहनांना जाण्यासाठी मेरूगिरी पर्वतावरून जाणारा पर्यायी मार्ग उपलब्ध आहे परंतु त्या मार्गे ही वाहने न जाता वैद्यनाथ मंदिराच्या समोरील रस्त्यावरून वाहने जातात. गणपती मंदिर तसेच मंदिर परिसरातील बसवेश्वर चौक या ठिकाणी लोखंडी फाटक बसवून त्यावर अवजड वाहनांना प्रवेश निषेध अशी दर्शनी पाठी लावण्यात यावी त्यामुळे भाविक भक्तांचे गैरसोय दूर होण्यास मदत होणार आहे.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते संतोष पिसे, अनिल चौधरी, राम जोशी,राहुल कांदे, गिरीश सलगरे, शिवा बडे, काशिनाथ सरवदे, मुंजाभाऊ साठे, अनिल मिसाळ, कैलास रिकिबे, मुंजाभाऊ गरड पत्रकार मोहन चव्हाण, संतोष कांदे, संतोष कांबळे, सुंदर आव्हाड, सुरेंद्र परदेशी, राजीव कसबे, वैजनाथ केंद्रे, आकाश जोगदंड, सदाशिव गोडे, परमेश्वर कसबे, विनोद रोडे, प्रमोद पुरी, वसंत मुंडे, अर्जुन गिरी , अनंत कातकडे, गोविंद कांदे, योगेश मुंडे, गजानन पांचाळ, बालाजी मुंडे ,जयसिंग रोडे आदी उपस्थित होते.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077